# स्मार्ट प्रकल्पातील समुदाय आधारित संस्था स्तरावरील बांधकामे, मशिनरी, उपकरणे व अनुषंगिक साहित्य यांची देयके अदायगी करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना

---

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समिती "SPAC" मध्ये समुदाय आधारित संस्थांच्या उपप्रकल्पांना मंजुरी देण्यात येते. मंजुरी देण्यात आलेल्या समुदाय आधारित संस्थांना पीसीएमयु (PCMU) कडून पीआययु (PIU) मार्फत अनुदान वितरण करण्यात येते. तदनंतर, प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणे कडून "PFMS" द्वारे सीबीओ यांना अनुदान वितरित करण्यात येते. समुदाय आधारित संस्थांना उपप्रकल्पासाठी अनुदानाचे वितरण टप्पे निश्चित केलेले आहेत. सीबीओनी जागतिक बँकेच्या संपादन प्रक्रियेचा अवलंब करून प्रत्यक्ष प्रकल्पाचे कामकाज करण्यासाठी बांधकामे व मशिनरी पुरवठा करणाऱ्या सेवा पुरवठादार / कंत्राटदार यांची निवड करून, त्यांनी केलेली बांधकामे तसेच मशीनरी पुरवठादारास देयकाची अदायगी करताना तसेच अदायगी नंतर जतन करण्याच्या लेखाविषयक दस्तऐवजाबाबत कार्यपद्धती खालील प्रमाणे आहे.

## अ )बांधकाम विषयक कार्यपद्धती :-

१) CBO यांनी नियुक्त केलेले स्थापत्य अभियंता यांनी वेळोवेळी कामाची तपासणी करून सीबीओ स्तरावर खालील तक्ता "अ" प्रमाणे एकूण ५ वेळेस R.A.Bill (Running Account Bill) तयार करावेत, त्यापेक्षा जास्त RA Bill तयार करू नयेत.

२) R.A.Bill हे CBO आणि बांधकाम ठेकेदार यांचेतील करारनाम्या नुसार खालील प्रमाणे असणे आवश्यक आहे

तक्ता "अ"

| | |
|---|---|
| 1st R. A. Bill | Minimum on site 25% work complete of the Tender Cost |
| 2nd R. A. Bill | Minimum Progressive on site 45% work complete of the Tender Cost |
| 3rd R. A. Bill | Minimum Progressive on site 65% work complete of the Tender Cost |
| 4th R. A. Bill | Minimum Progressive on site 85% work complete of the total cost |
| Final Work Completed as per Tender | On site remaining 15%work complete of the Tender Cost |

३) सदरील R.A.Bill करिता परिशिष्ट १ ते ९ नुसार, RA Bill ची नोंद करणे आवश्यक आहे. परिशिष्ट १ ते ९ नमुने तयार करण्यात आलेले असून सोबत सहपत्रित केले आहेत .

४) CBO ने नियुक्त केलेल्या ठेकेदारांच्या स्थापत्य अभियंत्याने बांधकामा संदर्भात, केलेल्या कामाच्या घेतलेल्या मोजमापाच्या नोंदीनुसार कच्चे देयक तयार करावे व CBO अभियंत्याकडे सादर करावे.

५) CBO अभियंत्यानी ठेकेदारांचे अभियंत्याकडून प्राप्त कच्चे देयक व प्रत्यक्ष कामाची वस्तूस्थिती आधारे प्रकल्पाने परिपत्रित केलेल्या विहित नमून्यातील मोजमाप पुस्तिकेत कामाच्या मोजमापाच्या नोंदी घ्याव्यात. नोंदीनुसार झालेल्या कामाचे देयक तयार करावे

६) CBO यांनी देयक क्र. I, II, III, IV अदायगी करीत असल्याचे माहितीस्तव DIU कार्यालयास लेखी कळविण्यात यावे. तथापि प्रत्येक घटकाचे अंतिम देयक अदायगी करणेसाठी CBO यांनी DIU यांची लेखी परवानगी घेणेची आहे.

७) CBO कडील प्रत्येक घटकाच्या बांधकामाचे तक्ता "अ"नुसार एकुण ४ धावते व १ अंतिम देयक असे एकुण ५ देयके होणार असून त्यापैकी किमान एक देयक RIU स्तरावरील सहाय्यक अभियंता यांनी त्यांचे नियमित तपासणी कार्यक्रमात तपासणी करण्याचे आहे.

८) RIU स्तरावरील सहाय्यक अभियंता यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील CBO यांचे कडील प्रत्येक घटकाच्या बांधकामाचे ५ देयका पैकी किमान एक देयक नियमित तपासणी कार्यक्रमामध्ये तपासणी करणेचे आहे. (उदा. कार्यक्षेत्रात एक अथवा अनेक CBO यांचेकडे बांधकामे सुरु असल्यास प्रत्येक बांधकामाचे किमान एक म्हणजेच पहिल्या कामाचे 1st RA BILL, दुसऱ्या कामाचे 2nd RA BILL, तिसऱ्या कामाचे 3rd RA BILL, चौथ्या कामाचे 4th RA BILL व पाचव्या कामाचे 5th Final BILL याप्रमाणे सर्व कामाची प्रत्येकी पाच देयकांपैकी किमान एक देयक तपासण्याचे आहे.)

९) RIU स्तरावरील सहाय्यक अभियंता यांनी त्यांचे नियमित तपासणी कार्यक्रमामध्ये CBO यांचेकडील तयार बांधकामाचे कामास समक्ष भेट देऊन तपासणी करावी. CBO अभियंत्यानी MB पुस्तिकेत मोजमापाच्या घेतलेल्या नोंदी व झालेल्या कामाची प्रत्यक्ष तपासणी करून त्याबाबतचा तपासणी अहवाल तयार करुन देयक अदायगीसाठी स्पष्ट अभिप्रायासह DIU यांचेमार्फत सीबीओ यांना कळविण्याचे आहे. DIU स्तरावर CBO निहाय घटक निहाय बांधकाम व मशीनरी या घटकांची तपासणी बाबत खालील नमुन्यात रजिस्टर ठेवून नोंदी घेणेच्या आहेत.

नमूना :-

| अनू क्र | CBO चे नाव | प्रकल्पांतर्गत घटकाचे नाव | घटकाची मंजूर प्रकल्पातील प्रस्तावित रक्कम रू (लाख) | ठेकेदारांचे /पुरवठादाराचे नाव | बांधकाम स्टेजेस | CBO यांनी बांधकाम stage पूर्णत्वाबबत DIU ला कळविलेले पत्र क्र व दिनाक | देयकाची रक्कम रू (लाख) | RIU स. अभि. यांचा तपासणी अहवाल असल्यास नमूद अभिप्राय | Completion stage चे देयक तपासणी अहवाल मधील नमूद अभिप्राय | DIU स्तरावरून COMPLETION STAGE देयक अदायगीस दिलेली मान्यता पत्र क्र व दिनाक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | XYZ | गोदाम (५०० MT) | ५८.४१ | ABC | I RA | | | | | |
| | | | | | II RA | | | | | |
| | | | | | III RA | | | | | |
| | | | | | IV RA | | | | | |
| | | | | | V Final | | | | | |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | XYZ | Machinery Shed | | ABC | I RA | | | | | |
| | | | | | II RA | | | | | |
| | | | | | III RA | | | | | |
| | | | | | IV RA | | | | | |
| | | | | | V Final | | | | | |

१०) सीबीओ यांचेकडून प्राप्त झालेले देयक अदायगीच्या माहितीस अनुसरुन DIU यांनी संबंधित घटकाच्या देयकाची तपासणी RIU स्तरावरील सहाय्यक अभियंता यांनी सादर केलेल्या तपासणी अहवालावरुन त्यांचे नियमित तपासणीत केली आहे किंवा नाही यांची पडताळणी करावी व तशा नोंदी रजिस्टरला घ्याव्यात.

११) विभागीय स्तरावरील सहाय्यक अभियंता यांचे नियमित तपासणीत ज्या घटकाचे बांधकामाचे completion stage चे (शेवटचे) देयक आलेले नाही अशा बाबतीत त्या घटकाच्या completion stage च्या देयकाची तपासणी जिल्हा नोडल अधिकारी **अथवा** पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ या दोघापैकी एक अथवा दोघे **आणि** CBO यांचे स्थापत्य अभियंता यांचे संयुक्त तपासणी पथकाने करून तपासणी अहवाल व देयक अदायगीसाठी स्पष्ट अभिप्राय DIU कार्यालयास सादर करणेचा आहे.

१२) कोणत्याही परिस्थितीत प्रत्येक कामाच्या देयक अदायगीमध्ये ५th Final BILL पैकी completion stage चे (शेवटचे) देयक हे RIU स्तरावरील सहाय्यक अभियंता यांनी **किंवा** जिल्हा नोडल अधिकारी / पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ या तिघांपैकी एक **आणि** CBO यांचे स्थापत्य अभियंता यांचे संयुक्त तपासणी पथकाने करणेचे अनिवार्य राहील.

१३) completion stage चे (शेवटचे) देयक हे RIU स्तरावरील सहाय्यक अभियंता यांनी **किंवा** जिल्हा नोडल अधिकारी / पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ **आणि** CBO यांचे स्थापत्य अभियंता यांचे संयुक्त तपासणी पथकाचे अहवाला आधारेच DIU कार्यालयाकडून सीबीओ यांना त्यांचे मागणीस अनुसरून देयक अदायगीस परवानगी देण्याची आहे.

१४) सीबीओचा स्थापत्य अभियंता फाउंडेशन प्लॅन तयार करेल. पाया खोदाईची मोजमापे व जमिनीचे तलांक (Levels) ही CBO अभियंता , संचालक (दोन) व ठेकेदार अभियंता यांच्या उपस्थितीत घ्यावीत व मोजमापे घेतानाचे Geo Tagged फोटो सोबत ठेवावेत.

१५) बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदर बांधकामाचा रेकॉर्ड प्लॅन अंतिम देयकासोबत जोडण्यात यावा. प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण झाल्यानंतरची मोजमापे घेऊन इमारतीच्या मूळ नकाशावर अंतिम मोजमापे टाकण्यात यावीत.

१६) प्रत्येक CBO ने बांधकामाच्या साइट वर Work Order book ठेवावे व कामावर भेट देणाऱ्या अधिकारी/ अभियंता यांचे बांधकामाबाबतचे स्पष्ट अभिप्राय नोंदवण्यात यावे व त्यानुसार कामात सुधारणा करावी.

१७) बांधकाम विषयक Vender चे (Bill) देयक अदा करताना सीबीओ यांनी खालील दस्तावेज याची खातरजमा करून घेणे आवश्यक आहे.

A. CBO यांनी कंत्राटदारास दिलेला कार्यारंभ आदेश.
B. CBO नी कंत्राटदारासोबत केलेला करारनामा (BOQ सह.)
C. RA Bill - परिशिष्ट १ ते ९ (सोबत परिपत्रित केली आहेत)
D. RA Bill Measurement Book याची छायांकीत प्रत

E. प्रत्यक्ष बांधकाम सुरु असताना वेळोवेळी stage wise घेतलेली Geo- Tagged छायाचित्रे (किमान-५)

F. देयक निहाय प्रकल्पाच्या RIU स्तरावरील सहाय्यक अभियंत्याची तपासणी झालेली असल्यास अहवाल व देयक अदायगीसाठी स्पष्ट अभिप्राय

G. ज्या घटकाचे Completion stage (शेवटचे )देयक तपासणी बाबत RIU स्तरावरील सहाय्यक अभियंत्याचे तपासणी अहवाल नसल्यास या बाबतीत जिल्हा नोडल अधिकारी **अथवा** पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ अथवा दोघे आणि CBO यांचे स्थापत्य अभियंता यांचा सयूक्त तपासणी अहवाल व देयक अदायगीसाठी स्पष्ट अभिप्राय आवश्यक राहील तसेच देयक अंतिम stage चे असल्यास देयक अदायगीसाठी DIU कार्यालयाची लेखी परवानगी आवश्यक राहील.

H. अंतिम देयकासोबत बांधकामाचा अंतिम मोजमापे आराखडा (Record Plan)

I. Foundation Plan - फाउंडेशन प्लॅन

J. TDS कर भरणा केल्याचे चलन

K. Material lab testing report (National Accreditation Board येथील नोंदणीकृत प्रयोगशाळे मध्ये बांधकाम मटेरियल चे खालील नमुद प्रमाणे किमान एक lab testing report घेणे आवश्यक आहे.

| | Lab Testing | संख्या |
|---|---|---|
| 1 | CEMENT ;- i) Fineness, Consistency<br>ii) Compressive strength<br>iii)Specificgravity. | 1 |
| 2 | M20 CONCRETE ;- i)Mix Design with all tests on basic materials | 1 |
| | ii)Concrete cube compressive strength | 1 |
| | iii) Rebound hammer Test | 1 |
| 3 | M15 CONCRETE ;- i)Mix Design with all tests on basic materials | 1 |
| | ii)Concrete cube compressive strength | 2 |
| 4 | MAETAL FOR ROAD ;- i)Water absorption,<br>ii)Specific gravity,<br>iii) Impact value,<br>iv)Crushing value<br>v) Combined Flakiness & Elongation ofsingle metal | 1 |
| 5 | BRICKS :-i) Water Absorption (Set of 5 Bricks),<br>ii) Compressive strength (Set of 5 Bricks),<br>iii)Efflorescence Test (Set of 5 Bricks) | 1 |
| 6 | STONE MASONARY:- i)Crushing value,/compressive strength,<br>ii) water absorption,<br>iii)Specific Gravity. | 1 |
| 7 | TMT STEEL :-i)Yield stress,<br>ii) Ultimate tensile stress,<br>iii) E longation test, weight per running meter. | 1 |
| 8 | SAND :-i)Fineness Modulus,<br>ii)Silt content. | 1 |
| ९ | MURUM;-i) liquid Limit | 1 |
| | ii) Density of compacted layer | 1 |
| | iii) Proctor Test | 1 |
| 10 | Material Testing OF PEB Structural Works as per Design. | 1 |

L. Labour cess भरणा केल्याचे चलन

M. Labour Insurance भरणा केल्याचे चलन व प्रमाणपत्र

N. Royalty भरल्याचे चलन

१८) सदर बांधकामास अधिकचा वेळ लागत असल्यास DIU यांनी PIU कृषि संदर्भात नोडल अधिकारी-RIU व अन्य PIU संदर्भात नोडल अधिकारी-PIU यांची मान्यता घेवून कामासाठी ३ महीने मुदतवाढ देण्यात यावी.

## ब ) वस्तू व मशीन विषयक कार्यपद्धती

१) सीबीओ यांनी नियुक्त केलेले अभियंता हे प्राप्त वस्तू व मशीनची पाहणी करून तपासणी अहवाल तयार करतील.

२) सीबीओने नियुक्त केलेले अभियंता प्राप्त वस्तू व मशिनरी यांची नोंदवही मध्ये नोंद घेतील.

३) नोंदी आधारे सीबीओ अभियंता यांनी देयक तयार करावे व देयक अदायगीसाठी DIU/RIU यांचेकडे परवानगी मागणी करावी.

४) रक्कम रु.५०.०० लाखपेक्षा कमी रकमेचे देयक (Bill) असल्यास नोडल अधिकारी DIU **अथवा** पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ या दोघा पैकी एक **आणि** सीबीओ चे दोन संचालक व अभियंता या ४ अधिकारी यांच्या पथकाने संयुक्तपणे वस्तू व मशीनची तपासणी करून अहवाल सादर करावा. अहवालासोबत Geo Tagging मधील छायाचित्रे सादर करावी.

५) रक्कम रु.५०.०० लाख किंवा त्यापेक्षा अधिक रकमेचे देयक (Bill) असल्यास, RIU चे नोडल अधिकारी **अथवा** सनियंत्रण व मूल्यमापन तज्ञ **अथवा** सहाय्यक अभियंता या तिघा पैकी एक **आणि** DIU नोडल अधिकारी **अथवा** पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ या दोघा पैकी एक **आणि** सीबीओ चे दोन संचालक व अभियंता या ५ अधिकारी यांच्या पथकाने संयुक्तपणे वस्तू व मशीनची तपासणी करून अहवाल सादर करावा. अहवालासोबत Geo Tagging मधील छायाचित्रे सादर करावी.

६) तपासणी अहवालामध्ये Geo Tag फोटो मधील उपस्थितांच्या नावे, पदे व स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. सीबीओकडील प्राप्त देयक संबंधित पथकाने अदायगीसाठी स्पष्ट अभिप्रायांसह शिफारस करावी.

७) उपरोक्त प्रमाणे प्राप्त तपासणी अहवालाची कार्यालयीन रजिस्टरला नोंद घेऊन देयक अदायगीची लेखी परवानगी DIU यांनी CBO यांना देण्यात यावी.

८) वस्तू व मशीन विषयक Vender चे देयक अदा करताना सीबीओ यांनी खालील दस्ताऐवजाची खातरजमा करून घेतील.

i. पुरवठादार व संस्थेसोबतची मूळ कराराची प्रत

ii. पुरवठा आदेश

iii. वितरण चलन प्रमाणपत्र (Delivery Challan)

iv. मूळ देयक
v. संबंधित कर भरणा करण्याची पावती
vi. पुरवठादारने दिलेले Testing रिपोर्ट.
vii. संस्थेच्या संचालक यांना वस्तू व मशीन कार्यान्वित करणे बाबत प्रशिक्षण दिले बाबतचा तपासणी अहवाल.
viii. तपासणी पथकाचा तपासणी अहवाल (देयक अदायगी अनुषंगाने DIU/RIUकडील प्राप्त शिफारस)
ix. देयक अदायगी साठी DIU कार्यालयाची लेखी परवानगी

## क) बांधकाम, मशिनरी, तत्सम साहित्य खरेदी केल्यानंतर समुदाय आधारित संस्थांनी जतन करावयाच्या लेखाविषयक दस्तऐवजांबाबत

१. बांधकाम विषयक आवश्यक असणारे दस्तऐवज :-बांधकाम च्या मुद्दा क्रमांक ११ व १२ मध्ये नमूद केलेले अभिलेखे जतन करणे अनिवार्य आहे. या व्यतिरिक्त उप प्रकल्प मंजूरी आदेश., मुदतवाढीचे आदेश (दिले गेले असल्यास) जतन करावे.
२. वस्तु व यंत्रसामुग्री विषयक आवश्यक असणारे दस्तऐवज :- मशीनरी च्या मुद्दा क्रमांक ७ मधील अभिलेखे जतन करणे अनिवार्य आहे. उप प्रकल्प मंजूरी आदेश., स्टॉक रजिस्टर, पुरवठादारांकडून प्राप्त मुळ देयक, विविध कर कपाती केल्याबाबतचे व ते भरणा केल्याबाबतचे कागदपत्रे जतन करावी.
३. खरेदी व लेखा विषयक नस्त्या स्वतंत्र असाव्यात.

## ड ) कर कपात व भरणा करणे बाबत :-

लाभार्थी संस्थांच्या स्तरावर प्रकल्पांतर्गत केलेल्या खर्चाच्या अनुषंगाने, शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या दराने कर कपाती करणे, त्याचा भरणा शासन तिजोरीत करणे व त्याबाबतचे Tax Returns विहित कालमर्यादेत करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सद्या प्रचलित असलेल्या दराचा तक्ता खाली देण्यात आला आहे.

१) बांधकाम विषयक आवश्यक असणारे कर कपात व भरणा करणे बाबत

| Sr. No. | Tax Deduction | Submissions (online options available) |
|---|---|---|
| १ | TDS @ 2% of Each R.A.Bill Amounts (रू २०००० वरील देयका साठी) | State Bank of India - Local Branch |
| २ | Labour Cess @ 1% of Each R.A.Bill Amounts | Bank of Maharashtra - Local Branch |
| ३ | Labour Insurance @ 0.5%OF TENDER COST OF WORK (One Time Deductions) | Directorate of Insurance - Mumbai. |
| ४ | Security deposit (Retention Amount)@ 6% of Each R.A.Bill Amounts | Balance on CBO Account |
| ५ | For Royalty Charges Each R.A.Bill | Tahsil office (Taluka Place) |

२) वस्तु व यंत्रसामुग्री विषयक आवश्यक असणारे कर कपात व भरणा करणेबाबत

| Sr.No. | Tax Deduction | Submissions (online options available) |
|---|---|---|
| १ | TDS @ 2% of Bill Amounts | State Bank of India - Local Branch |

| | | |
|---|---|---|
| २ | CGST TDS @ 1% of Bill Amounts | Bank of Maharashtra - Local Branch |
| ३ | SGST TDS @ 1% of Bill Amounts | Bank of Maharashtra - Local Branch |

## ई ) लेखाविषयक अभिलेख्यांबाबत :-

अ) लाभार्थी संस्थांनी स्मार्ट प्रकल्पासाठी उघडण्यात आलेले बँक खात्याचे पासबुक वेळोवेळी अद्यावत करून घेणे आवश्यक आहे.

आ) लाभार्थी संस्थांनी उपप्रकल्पाचे लेखा विषयक अभिलेख टॅली सॉफ्टवेअरच्या मदतीने दुहेरी नोंद (Double Entry System) पध्दतीने ठेवणे आवश्यक आहे.

इ) टॅली सॉफ्टवेअर मधून तयार झालेले कॅश बुक, बँक ताळमेळ पत्रक, जनरल रजिस्टर, दस्तऐवजांचे प्रतिमहा प्रिंट आऊट काढून, लाभार्थी संस्थेच्या BOD / सचिवांची स्वाक्षरी घेवून स्वतंत्र नस्तीमध्ये जतन करावेत. तसेच, टॅली मधील नोंदी व अद्यावत बँक पासबुक या अनुषंगाने प्रति महा बँकेशी ताळमेळ घेवून, ताळमेळ पत्रक नस्तीमध्ये लावून लाभार्थी संस्थांच्या BOD /सचिवांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

## फ ) प्रकल्पाकडून सनियंत्रण व लेखापरिक्षण :-

१. लाभार्थी संस्थेचे लेखाविषयक अभिलेख व कामकाज नियमानुसार व सुरळीत पार पडत असल्याची खातरजमा करण्यासाठी, जिल्हा अंमलबजावणी स्तरावरील प्रकल्पाकडून नियुक्त लेखापाल, यांना भेट देवून मार्गदर्शन घेऊन त्या नुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल DIU कार्यालय प्रमुखांना सादर करणेचा आहे .

२. उपप्रकल्पाच्या पुर्ण कालावधीमध्ये लाभार्थी संस्थेस, एकंदर तीन वेळेस (एकदा प्रकल्पाकडून नियुक्त केलेल्या लेखापरिक्षकाकडून व दोनदा लाभार्थी संस्थेकडून नियुक्त केलेल्या लेखापरिक्षकाकडून) लेखापरिक्षित उपयोगिता प्रमाणपत्र प्रकल्पास सादर करणे आवश्यक राहील.

३. पुर्ण उपप्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर, लाभार्थी संस्थेकडून नियुक्त केलेल्या लेखापरिक्षकाकडून प्रमाणित केलेले लेखापरिक्षित उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४. लाभार्थी संस्थेने लेखापरिक्षकास त्यांचेस्तरावरील स्मार्ट प्रकल्पासंदर्भातील अभिलेख उपलब्ध करुन द्यावेत.

(कौस्तुभ दिवेगावकर)
**प्रकल्प संचालक, स्मार्ट**

जा.क्र.स्मार्ट/पीसीएमयु/सीबीओ/७०५/२०२३,  दि.१८/०८/२०२३